# लोकशाही सुशासनाची आधारभूत तत्वे

**प्रा. डॉ. पदमाकर प्रेमदास दारोंडे**
सुवालाल पाटणी महाविद्यालय, पुलगाव
ता. देवळी, जि. वर्धा
मो. न. ९५९५१९१९८४

---

**सारांश -**

आजपर्यन्त जगात अनेक शासन पद्ती निर्माण झाल्यात त्यात राजेशाही, हुकुमशाही आहेत परंतु त्यात सर्वात उत्कृष्ट अशी लोकशाही शासन पद्धती म्हणता येईल. लोकशाही हा शासनाचा प्रकारच नसून तो सामाजिक आणि राजनीतीक जीवन जगण्याची एक पद्धती आहे. लोकशाहीत व्यक्तीच्या स्वातंत्र्याला सर्वोच्च महत्व दिले जाते. लोकशाही शासन व्यवस्थेचा संबंध स्वतंत्रता आणि समता या लोकशाही तत्वानसी जोडला जातो, आणि सुशासन, हे शासनाच्या कार्याचे मुल्यमापणात्मक मापदंड करते. शासन, सार्वजनिक संस्था आणि सार्वजनिक व्यवहार या द्वारे मानवी हक्काच्या प्राप्तीची आणि सुरक्षिततेची हमी देते. सुशासन म्हणजे चांगले शासन (good governance) ज्यामध्ये मानवी अधिकाराच्या सुरक्षिततेची हमी, कल्याणकारी बजेट, योग्य व्यवस्थापन, कायद्याचे राज्य, नैतिकता, न्याय, सहभाग, समता आणि सर्वसमावेशकता, जबाबदारी, पारदर्शकता, राहणीमान, प्रतिसाद, दर्जेदार शिक्षण-आरोग्य आणि सुरक्षिततेच्या अधिकाराची हमी देतात.

पस्तूत पेपरचा विषय "**लोकशाही सुशासनाची आधारभूत तत्वे**" हा आहे या पेपरच्या माध्यमातून सुशासन यशस्वी करण्यासाठी त्याची आधारभूत तत्वे कोणती आहेत हे दृष्टीस आणणे आहे.

---

**प्रस्तावना -**

मानवी समाजाच्या शासन पद्धतीत अनेक राजेशाही, हुकुमशाही, आणि लोकशाही असे अनेक बदल घडून आले. पूर्वी राजाची कित्तेक वर्ष निरंकुश जुल्मी राजवट होती, त्या जुल्मी राजवटीच्या कित्तेक वर्षाच्या संघर्षानंतर लोकशाही आली. परंतु लोकशाही ही सर्वात चांगली शासन पद्धती नाही पण इतर शासन पद्धती पेक्षा उत्कृष्ट शासन प्रकार आहे. असे मत आधुनिक काळात मान्य झाले. लोकशाही हा शासनाचा प्रकारच नसून जीवन जगण्याची एक पद्धती आहे, दुसऱ्या अर्थाने लोकशाही ही एक प्रकारची राजकीय व्यवस्था आहे वा शासन पद्धतीचे नाव आहे. लोकशाही शासन व्यवस्थेचा संबंध स्वतंत्रता व समता या लोकशाही मुल्य वा आदर्शासी संबंधित आहे. त्यामुळेच लोकशाही शासन व्यवस्थेला पसंद केले जाते. आणि त्याचे समर्थन सुद्धा यासाठीच केले जाते. या शासन पद्धतीत नगरिकांना स्वतंत्रता आणि प्रत्येक नागरिकाला एक, समान महत्व दिल्या जाते. शासनाद्वारे बनविल्या गेलेल्या कायदया द्वारे कित्तेक वेळा नागरिकांची स्वतंत्रता मर्यादित केली जाते. परंतु लोकशाहीत नागरिक स्वत: सरकार आणि कायदा बनवितात त्यामुळे लोकशाहीत या गोष्टीची हमी असते. की नागरिकाच्या स्वातंत्र्याला अनावश्यक रीतीने मर्यादित केले जाऊ शकत नाही. जेव्हा नागरिक स्व:ताद्वारे निर्वाचित सरकारच्या माध्यमातून कायदा बनवितात, त्यामुळे स्वत: जनतेचा त्या सरकारवर आरोप निरर्थक असतो आणि जर कोणते सरकार नागरिकांच्या स्वातंत्र्याला अवश्यकतेपेक्षा अधिक मर्यादित करीत असेल तर परत नागरिक निवडणुकीच्या माध्यमातून त्या सरकारला सुद्धा बदलवू शकतात. अश्या प्रकारे लोकशाहीचा स्वातंत्र्यासी जवळचा संबंध असतो त्याच प्रमाणे

लोकशाहीत नगरिकाच्या समानतेच्या अधिकाराची अभिव्यती सुद्धा होते. प्रौढ मताधिकार 'एक व्यक्ति एक मत' 'एक मत एक मूल्य' या सिद्धांताद्वारे होते. यातून ही गोष्ट समजून येते की लोकशाहीत प्रत्येक नागरिकाला सरकार बनविण्याचे आणि त्याला नियंत्रित करण्याचे एक सारखा अधिकार मिळतो. तो व्यक्ति कोणत्याही सामाजिक वर्गातून येवो अश्या प्रकारे राजकीय समानता लोकशाहीचे अनिवार्य अंग आहे. याच्या व्यतिरिक्त लोकशाहीत सर्व नागरिकांना कायदयाच्या दृष्टिने समान मानले जाते.

लोकशाहीत नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी समता व स्वातंत्र्य या तत्वाची लोकशाहीत हमी मिळत असल्यानंतही यापेक्षा अधिक चांगले पारदर्शक, जबाबदार व न्याय, या अनुषंगाने सुशासन Good Governance ची संकल्पना उदयास आली. राजकीय आणि सामाजिक जीवनात शिस्त, पारदर्शक प्रशासन, स्वशासन इत्यादि सारखे सुशासन वाटणारे आणखी काही व्यापकपणे वापले जाणारे शब्द आहेत. 'सुशासन' म्हणजे 'चांगले शासन' सुशासनात शासनाच्या कार्याला मूल्यमापनासी जोडल्या जाते सुशासनाच्या संकल्पनेत शासनाच्या सार्वजनिक संस्था आणि सार्वजनिक व्यवहार याच्या माध्यमातून मानव हक्काच्या प्राप्तीची व सुरक्षिततेची हमी दिल्या जाते.

'सुशासन' चांगले शासन Good Governance ची आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्य केलेली व्याख्या नाही तरी सुशासनात खालील गोष्टीचा समावेश होतो ज्यामध्ये चांगले बजेट, योग्य व्यवस्थापन, कायद्याचे राज्य, नैतिकता, न्याय, सहभाग, समता आणि सर्वसमावेशकता, जबाबदारी, पारदर्शकता, कार्यक्षमता, प्रतिसाद, दर्जेदार शिक्षण व आरोग्य आणि सुरक्षिततेच्या अधिकाराची हमी देतात. सुशासनाच्या अभावी लोकशाहीचा विकास होऊ शकत नाही. **लोकशाहीचे सामाजिक लोकशाहीत रूपांतरित होण्यासाठि प्रभावी लोकशाही संस्था ही सुशासनाची पूर्व अट आहे.** ज्या लोकशाहीत नागरिकांचे राहणीमान, आरोग्य, शिक्षण, यात सुधार होत नाही, जे लोक प्रशासनात सहभागी होऊ शकत नाहीत, मानवी हक्काचा आदर केला जात नाही, जिथे निपक्ष न्यायाची हमी मिळत नाही तो देश स्वत:ला सुशासनाचे राज्य म्हणून संबोधू शकत नाही. ही तत्वे आधुनिक लोकशाहीचा पाया आहे. सुशासनासी बांधील, पारदर्शक पणे शासन करणारी सरकारेच लोकशाही बनतात. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष मताप्रमाणे वर्तमान काळात तिसऱ्या जगातील राष्ट्रना शक्तिशाली नेतृवासोबतच शक्तीशाली लोकशाही संस्थांची गरज आहे असे मत व्यक्त केले.

स्थायी शासक वर्ग सुशासन सरकारसाठी सर्वात मोठा धोका असतो. लोकशाहीला स्वीकार करण्यासोबतच आणि कोणतेही निष्कर्ष काढायच्या आधी त्या देश्यातील अस्तित्वात असलेल्या विशेष अधिकार प्राप्त वर्गाचे अस्तित्व विसरून जाने एक मोठी धोक्याची सूचना असेल. त्या देशात 'स्वातंत्र्य' कोणत्याही विशेषाअधिकार प्राप्त वर्गाच्याच वाट्याला येईल की ते स्वातंत्र्य सर्वांच्या वाटेल येईल हा प्रश्न निर्माण होतो. स्वातंत्र्य सर्वांच्या वाटेल येईल तेव्हाच तो देश सुशासनाचा देश आहे असे म्हणावे लागेल

संयुक्त राष्ट्र संघाने सुशासनाची महत्वपूर्ण 8 तत्वे सांगितली आहेत ते पुढीलप्रमाणे त्याची चर्चा करता येईल.

**1) सहभाग -** सहभाग हा सुशासनाचे पहिले तत्वे आहे. सहभागाचा अर्थ सहवास आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य देखील आहे. संविधानिक संस्था कायदेमंडळ, कार्यकारी मंडल इत्यादि किंवा प्रतिनिधींद्वारे लोकांना त्यांचे स्वतःचे मत मांडता आले पाहिजे. यामध्ये स्त्री-पुरुष, मुख्यत: वंचित घटक, अपंग, मागासवर्गीय, अल्पसंख्याक इत्यादींचा समावेश होतो, एकतर थेट किंवा त्यांच्या हिताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कायदेशीर संस्थांद्वारे. सहभाग ही एक अशी प्रक्रिया आहे ज्याद्वारे धोरण तयार करणे, समस्यांना प्राधान्य देणे, सार्वजनिक वस्तू आणि सेवांमध्ये प्रवेश करणे आणि संसाधनांचे वाटप करणे इत्यादिचा संबंध येतो.

**2) कायद्याचे राज्य -** सुशासनाचे दुसरे तत्वे कायद्याचे राज्य होय. कायद्या समोर सर्व नागरिक समान असले पाहिजे आणि कायद्याचे समान संरक्षण प्राप्त झाले पाहिजे. घटनेची कायदेशीर चौकट राज्यानी निःपक्षपातीपणे अंमलात आणली पाहिजे, विशेषता मानवी हक्क कायदयावर आधारित असावे. कोणलाही विशेष अधिकार नसावे कायदयाच्या राज्या शीवाय राजकारण म्हणजे 'मत्स्य न्याय' होईल 'जीसकी लाठी उसकी भैस' असे होईल म्हणजे शक्ति शाली व्यक्तीला आपल्या सर्व अधिकारचा उपभोग घायला मिळेल आणि दुर्बल व्यक्तीला कोणतेही अधिकार मिळणार नाही. कायद्याचे राज्य हे लोकशाही च्या स्वातंत्र्य आणि समतेच्या दोन तत्वावर आधारलेले असते. कायद्याचे राज्य राज्यातील व्यक्ति व्यक्तीत कोणताही भेदभाव करीत नाही. परंतु ते कायदे निपक्ष व वस्तुनिष्ठतेवर आधारित असले पाहिजे. सक्षम राजकीय संस्थांची निर्मिती किंवा सुधारणा यांचा समावेश सुशासनात होऊ शकतो.

**3) समता आणि सर्वसमावेशक -** सुशासनाचे तिसरे तत्वे समता आणि सर्वसमावेशक होय समता म्हणजे जात, धर्म, वंश, लिंग, रंग, किंवा व्यक्तीची सामाजिक स्थिति न जुमानता थोडक्यात सामाजिक आणि नैसर्गिक भेदभाव न करता समान संधि प्रत्येक नागरिकाला मिळावी असी व्यवस्था म्हणजे समानता आणि सर्वसामावेशकता होय. सुशासन न्यायाची हमी देते. सर्वसमावेशकता म्हणजे समाजासाठी कोणतेही धोरण, नीती ठरवीताना आणि कार्यक्रम तयार करताना समाजात राहणाऱ्या सर्व व्यक्ती आणि गटांच्या इच्छा, आकांक्षा, अपेक्षा, विचार आणि मते विचारात घेणे आवश्यक आहे. समाजाचे कल्याण हेच शासनाचे अंतिम उद्दिष्ट असावे आणि राज्यातील सर्व नागरिकांचा त्यात वाटा असावा असे शासन सुशासन असते. समाजाच्या मुख्य प्रवाहातून त्यांना वगळलेले वाटू नये. भारतातील चालू आरक्षण धोरणे आणि अमेरिकेतील होकारार्थी कृती (affirmative action) अशा लोकांसाठी होती जे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक दृष्टिने मागासलेले होते.

**4) सर्वसम्मती अभिमुख -** सुशासनाचे चौथे तत्व सर्वसम्मती अभिमुख होय. राज्यात शांतता आणि एकोपा टिकून राहण्यासाठी राज्यातील वेगवेगळ्या समुदयात एकोपा असणे आवश्यक आहे. ज्यामुळे संपूर्ण राज्यातील जनतेकडून शासनाची संरचना आणि कार्यप्रणालीला वैध मान्यता प्राप्त होते. नागरिकांमध्ये तडजोड करण्याऐवजी सहयोगाचा समावेश असतो. बहुमताने निर्णय घेण्यासोबतच आल्पसंख्याकाचे मत विचारात घेतल्या जातात.

**5) परिणामकारकता आणि कार्यक्षमता -** सुशासनाचे पाचवे तत्वे परिणामकारकता आणि कार्यक्षमता होय. देशातील नागरिकांसाठी आखायचे धोरण, नीती, कार्यक्रम आणि त्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्था या परिणामकारकता आणि कार्यक्षमतेवर भर देतात. देशातील राजकीय संस्था सामान्य जनतेच्या सर्व गरजा पूर्ण करतात आणि संसाधनाचा वापर करतात. सर्व सामान्य जनतेच्या कल्यानाची कार्य करण्यासाठी कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षन दिले जाते.

**6) जबाबदारी -** सुशासनाचे सहावे तत्वे जबाबदारी होय. सुशासनाचा मुख्य उद्देश नागरिकांचे मुख्यता सर्वसामान्याचे कल्याण करणे असते आणि शासन जनतेला उत्तरदायी असल्यासीवाय हे घडू शकत नाही. सुशासनात देशातील सरकारी संस्था, सार्वजनिक संस्था, खाजगी संस्था आणि नागरी समाज संस्था सर्वाना जबाबदार धरले जातात. जनतेच्या कार्यासाठी निष्क्रिय असलेले संस्था व व्यक्तीला जबाबदार धरुन त्यावर कारवाही केली जाते. उत्तरदायित्वाच्या तत्वात माहितीचे देवाणघेवाण आणि पारदर्शक केंद्रस्थानी असते. त्यासाठी प्रशासन आणि संरचनांना प्रोत्साहन दिले जाते. त्याच बरोबर राजकीय संस्था आणि प्रशासन कार्याचे परीक्षण करून त्याच्या निष्क्रियतेच्या कार्यासाठी याच्यावर कारवाही केली जाते.

**7) पारदर्शकता -** सुशासनाचे सातवे तत्वे पारदर्शकता होय. याचा अर्थ राज्यातील संविधानात मान्य असणाऱ्या संस्था आणि संविधानात मान्यता नसणाऱ्या संस्था यांनी घेतलेले निर्णय जनतेपर्यंतन पोहचली पाहिजे. त्यासाठी माध्यमे ही खुली असली पाहिजे. त्यावर राज्याचे मर्यादित नियंत्रण असावे. राज्यातील सर्व नागरिकांसाठी राजकीय संस्थानी (राजकीय आणि गैरराजकीय, सरकारी अनुदान मिळविणाऱ्या आणि न मिळविणाऱ्या) घेतलेले निर्णयाची माहिती सर्व सामान्य जनतेसाठी उपलब्ध असली पाहिजे. पारदर्शकतेमुळे भ्रष्ट्राचाराला कमी वाव

मिळतो. पारदर्शकता प्रशासनांसाठी भारत सरकारने 2005 साली माहिती अधिकार सुरू करून सर्वसामान्य जनतेला लोकशाही प्रक्रियेत समाविष्ठा करून घेतले.

**8) प्रतिसाद -** सुशासनाचे आठवे तत्वे प्रतिसाद होय. देशातील सर्व नागरिकांनच्या कल्यानाचे कार्य ज्या राजकीय संस्थांवर सोपविले ते निर्धारित कालावधीत पूर्ण केले पाहिजे. ते पूर्ण करण्यासाठी अनावशक्यक वेळ टाळला पाहिजे जनतेला होणारा मानसिक त्रास कमी केला पाहिजे. जनतेच्या संबंधित असणाऱ्या सेवा आणि वितरनव्यवस्थे मध्ये त्यांची कार्य पूर्ण करण्यासाठी वेळ आणि कालावधीची तरतूद असणे आवश्यक आहे. त्यासंदर्भात विविध राज्यसरकारणी कायदे केले पाहिजे. सुशासनाचे वरील युनो नी आठ तत्वे सांगितली आहे. काहीनी बार तर त्यापेक्षा अधिक तत्वे सांगितले आहे. युरोपच्या 12 प्रिन्सिपल्स ऑफ गुड गव्हर्नन्समध्ये समाविष्ट आहे.युरोपच्या प्रिन्सिपल ऑफ गुड गव्हर्नन्स मध्ये समाविष्ट आहे.

**समारोप -**

मानवी समाजाच्या शासन पद्धतीत अनेक राजेशाही, हुकुमशाही, आणि लोकशाही असे बदल घडून आले. पूर्वी जुल्मी राजवट होती त्या जुल्मी राजवटीच्या कित्तेक वर्षाच्या संघर्षानंतर लोकशाही आली. परंतु लोकशाही ही सर्वात चांगली शासन पद्धती नाही पण इतर शासन पद्धतीपेक्षा उत्कृष्ट शासन प्रकार आहे. परंतु सुशासनाच्या अभावी लोकशाही फुलू शकत नाही. लोकशाहीचे समाजिक लोकशाहीत रूपांतरित होण्यासाठि प्रभावी लोकशाही संस्था ही सुशासनाची पूर्व अट आहे. ज्या लोकशाहीत नागरिकांचे राहणीमान, आरोग्य, शिक्षण, यात सुधार होत नाही, जे लोक प्रशासनात सहभागी होऊ शकत नाहीत, मानवी हक्काचा आदर केला जात नाही, जिथे निपक्ष न्यायाची हमी मिळत नाही तो देश स्वत:ला सुशासनाचे राज्य म्हणून संबोधू शकत नाही. ही तत्वे आधुनिक लोकशाहीचा पाया आहे. सुशासनासी बांधील, पारदर्शक पणे शासन करणारी सरकारेच लोकशाही बनतात. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष मताप्रमाणे वर्तमान काळात तिसऱ्या जगातील राष्ट्रना शक्तिशाली नेतृवासोबतच शक्तीशाली लोकशाही संस्थांची गरज आहे.

**संदर्भ -**


- DR Babasaheb Ambedkar Writings and Speeches; Vol.12; Education Department Govt. of Maharashtra. 1979
- बाबासाहेब आंबेडकर समग्र वाङमय खंड 17,डॉ बाबासाहेब आंबेडक प्रतिष्ठाण, कल्याण मंत्रालय, भारत सरकार, नई दिल्ली, अगस्त 2000
- समाज आणि राजदर्शन : डॉ. रामेंद्र, नरेंद्र प्रकाश जैन, मोतीलाल बणारसीदास द्वारा प्रकाशित, दिल्ली, नोव्हेंबर 2003
- डॉ, शर्मा हरीचंद्र : भारत मे स्थानीय प्रशासन, जयपूर कॉलेज बुक डिपार्ट,. जयपूर 1998.
- जैन, महेंद्र : उपकार प्रकाशन, आगरा, जानेवारी 2009.
- जैन, महेंद्र : उपकार प्रकाशन, आगरा, जानेवारी 2009.
- https://www.britannica.com/topic/governance/Democratic-governance
- https://www.britannica.com/topic/governance/Democratic-governance


Research Hub International Journal